# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

*जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,*
*४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व) ,मुंबई ५१.*
*फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९*
E-Mail: jtdirrom@gmail.com Web: http://mumbai.dte.org.in


**अत्यंत महत्वाचे व तातडीचे**

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३/२०१८/ 2008
दिनांक : 26 JUN 2018

प्रति,
प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी
विनाअनुदानीत पदवीका अभ्यासक्रमाच्या संस्था.
(मुंबई विभागा अंतर्गत)

विषयः- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या व्दित्तीय वर्षात अभ्साक्रमात बदल/ स्थलांतराने संस्थाबदल करण्याबाबत

संदर्भः- मा.संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.,मुंबई यांचे परिपत्रक क्र.१०/एनजीपी/वि.सं.ब. /२०१८/६१० दि.२१.०१.२०१८

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, या विभागा अंतर्गत येणा-या अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रम राबविणा-या विना अनुदानीत संस्थांनी संदर्भाकिंत पत्रात दिलेल्या निर्देशानुसार आपल्या संस्थेत प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम बदल अथवा स्थलांतराने संस्थांबदल करावयाचा असल्यास तसेच दुस-या व तिस-या वर्षानंतर संस्था बदल करावयाचे असल्यास **संदर्भीय पत्रात दिलेल्या निर्देशाचे पालन करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.**

तसेच परिपत्रकातील टप्पा क्र. १ मधील तपशील (अ) मध्ये नमुद केल्या नुसार प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दित्तीय सत्राच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार शाखा बदलाची कार्यवाही दि.२७.०६.२०१८ पर्यत पुर्ण केल्या नंतर शाखा बदल करण्याकरीता तयार करण्यात आलेली गुणवत्ता यादी तसेच विद्यार्थ्यांच्या अर्जाच्या व आवश्यक कागदपत्राच्या प्रतिची एक प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी. तशी आवश्यक ती मंजूरी घेण्यात यावी.

(प्रमोद.अ.नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई-५१.

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहिती करीता
२. श्री.भामरे, प्रोग्रॅमर सर्व संस्थांना **ई-मेल** व्दारे पाठवावे तसेच **संकेत स्थळावर** प्रसिध्द करावे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक
कालमर्यादित

जा.क्र. १०/एनजीपी/वि.सं.ब./२०१८/६७०
दिनांक : 21 JUN 2018

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

पहा : १) शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१८/सी.आर.२६/टीई-४, दि. ०५.०६.२०१८
२) शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.४७३(भाग-३)/तांशि ४, दि. २४.०४.२०१७
३) शासन अधिसूचना क्रमांक टीईएम - २०१५/सीआर २३६/टीई-४, दि. ११.०३.२०१६
४) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५

[redacted] : 4898
[redacted] :
22 JUN 2018

महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ ची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने संचालनालयाच्या अधिपत्याखालील पुर्णवेळ व्यावसायिक पदविका पाठ्यक्रमांच्या प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षाचे ( अभियात्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरींग टेक्नॉलॉजी ) नियम संदर्भ क्रमांक २ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. तद्नंतर दि. ०५/०६/२०१८ च्या अधिसूचनेद्वारे रिक्त जागांच्या गणनासंबंधीच्या तरतूदीमध्ये सुधारणा केलेली आहे, परंतू "विद्यार्थी स्थानांतरण" संदर्भातील दि. २४.०४.२०१७ च्या अधिसूचनेतील नियम क्र. १६ मध्ये कोणताही बदल केलेला नाही. त्यानुसार विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एच.एम.सी.टी या पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या संस्था बदल, पाठयक्रम बदल इ. बाबत दि. २४.०४.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतूदीनुसार विद्यार्थी संस्था बदल व पाठयक्रम बदल इ. साठी खालील तीन टप्प्यात कार्यवाही करण्यात येईल.

| टप्पा क्रमांक | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही करणारे सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अ) संस्था अंतर्गत पाठयक्रम बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार पाठयक्रम बदलाची कार्यवाही करावी. | दि. २७.६.२०१८ पर्यत | संबंधित संस्थेचे प्राचार्य |
| | ब) संस्था बदल / पाठयक्रम बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सादर करावेत. | दि. ३०.६.२०१८ पर्यत | संस्था बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे प्राचार्य |
| २ | अ) संस्था बदल /संस्था बदलासह पाठयक्रम बदल मान्यता | विना अनुदानित संस्थाकडून संस्था बदल/संस्था बदलासह पाठयक्रम बदलाबाबत एकाच विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील संस्थामधील प्राप्त अर्जाच्या (१—ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, | दि. ०७.७.२०१८ | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |

| टप्पा क्रमांक | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | (एकाच विभागीय कार्यालयांचे कार्यक्षेत्रातील संस्था) | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणा-या संस्था बदल/संस्थाबदलासह पाठयक्रम बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी. | | |
| | ब) संस्था बदल/ संस्था बदलासह पाठयक्रम बदल एका विभागीय कार्यालयातील संस्थेमधुन दुस-या विभागीय कार्यालयाअंतर्गत संस्थेतील बदल) /संस्था बदला सह शाखा बदल | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या एका विभागीय कार्यालयातील संस्थेमधुन दुस-या विभागीय कार्यालयाअंतर्गत संस्थेतील संस्था बदल/संस्था बदलासह पाठयक्रम बदल प्रस्तावांची केंद्रीभूत नियमावली २०१७-१८ मधील तरतुदीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव या संचालनालयास सादर करावा. | दि. ५.७.२०१८ पर्यत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| ३ | संस्था बदल (एका विभागीय कार्यालयातील संस्थेमधुन दुस-या विभागीय कार्यालयाअंतर्गत संस्थेतील बदल) /संस्था बदलासह शाखा बदल | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे २-ब नुसार प्राप्त होणा-या अर्जावर तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल. | -- | संचालक, तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई |

टिप: द्वितीय वर्ष संस्था बदल / पाठयक्रम बदलाच्या अर्जावरील कार्यवाही रकाना क्रमांक ४ मध्ये नमूद कालमर्यादेत करण्यात येईल. सदर कालमर्यादेनंतर प्राप्त झालेले अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील याची नोंद घेण्यात यावी.

विद्यार्थी संस्था बदल /संस्था बदलासह पाठयक्रम बदलाच्या अनुषंगाने खालील सूचनांचे सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये / संबंधित संस्था / विद्यार्थी यांनी काटेकार पालन करावे.

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे स्तरावरुन संस्था बदलास/संस्था बदलासह पाठयक्रम बदलास दिलेली मान्यता व संस्था स्तरावरुन संस्थेअंतर्गत पाठयक्रम बदलास दिलेली मान्यता याची माहिती मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना व या संचालनालयास सादर करावी.
२. विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेल्या Annexure A च्या विहित नमुन्यात संस्था बदलासाठीचा अर्ज संस्था बदलीने प्रवेश देणा-या संस्थेत सादर करावा. सदर अर्जासोबत सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, बदलीने प्रवेश देणा-या संस्थचे ना-हरकत प्रमाणपत्र ( सदर संस्थेत संबधित अभ्यासक्रमास रिक्त असलेल्या जागेच्या तपशिलासह ), पाठयक्रम बदल असल्यास महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे पात्रता प्रमाणपत्र, शिक्षणात खंड असल्यास त्याबाबत प्राचार्याचे प्रमाणपत्र किंवा रु.१००/-च्या स्टॅप पेपरवर शिक्षणातील खंडाबाबत प्रतिज्ञापत्र, प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्ष प्रवेशाचे ॲलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास), गुणपत्रिका (साक्षांकीत प्रत ) व संस्था बदल करण्यासाठीचे कारण या पृष्टर्थ पुरावे या दस्तावेजासह सादर करणे अनिवार्य राहील. अपुर्ण अर्ज

किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रा विना सादर केलेले अर्ज या संचालनालयास प्राप्त झाल्यास याबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची सर्व सबंधितांनी नोद घ्यावी.

३. सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, बदलीने प्रवेश देणा-या संस्थचे ना-हरकत प्रमाणपत्र व पाठयक्रम बदल असल्यास महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी पुर्णपणे संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

४. विद्यमान संस्थेच्या संस्थाप्रमूखांनी (Present / Parent Institute) विद्यार्थ्यांना संस्था बदलास ना-हरकत प्रमाणपत्र देतांना त्यामध्ये Institute DTE Code, Students Application ID, Course Choice Code, GAP इ. माहिती नमूद करणे अनिवार्य राहील.

५. अधिसंख्य कोटयातील ( Supernumerary Quota seats )जागे अंतर्गत प्रवेश देण्यात आलेले विद्यार्थी हे पाठयक्रम किंवा संस्था बदलण्यासाठी पात्र असणार नाहीत.

६. संस्था बदल व पाठयक्रम बदलासह संस्था बदल याकरीता विद्यार्थ्यांनी ज्या विनाअनुदानित संस्थेसाठी विनंती केलेली आहे त्या विनाअनुदानित संस्थेच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही उपरोक्त कालमर्यादेत होईल याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा करावा.

७. विषयांकीत प्रकरणी कार्यवाही करतांना संदर्भ क्रमांक २ मधील संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीतील तरतुदी / नियम स्पष्ट असून याबाबतची कार्यवाही करतांना नियम तथा तरतुदींचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्राधिका-यास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

८. सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, बदली मागितलेल्या विद्यार्थ्यांस या संचालनालयाचे मान्यता आदेश प्राप्त झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट द्यावे व कोणत्याही परिस्थितीत तत्पुर्वी ते देण्यात येवू नये. तसेच संबंधित विद्यार्थ्याच्या संस्था बदलीसाठी केवळ ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या कारणास्तव त्यांचे संस्थेतील प्रवेश रद्द करु नये.

९. विद्यार्थी संस्था बदलास या संचालनालयाची / संचालनालयाने प्राधिकृत केल्यानुसार सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांची पुर्व मान्यता नसतांना संस्था बदलाने जाण्यास संस्थेने (Present / Parent Institute) लिव्हींग सर्टीफीकेट देणे व संस्था बदलाने प्रवेश देणा-या संस्थने (Aspiring Institute ) प्रवेश दिल्यास त्यास संचालनालयामार्फत मान्यता देण्यात येणार नाही. या संचालनालयाची व संचालनालयाने प्राधिकृत केलेल्या प्राधिका-याची पुर्व मान्यता नसतांना संस्था बदलीने प्रवेश दिल्याचे आढळून आल्यास विद्यार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था व संस्था बदलाने प्रवेश देणारी संस्था या दोन्ही संस्थाच्या संस्थाप्रमूखांना जबाबदार धरून त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.

१०. संचालनालयाचे स्तरावरुन अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील विद्यार्थ्याचे वर नमुद संस्था बदल/संस्था बदलासह पाठयक्रम बदलाबाबतची कार्यवाही दि. ११.७.२०१८ पर्यत करण्यात येईल. सदर कालमर्यादे नंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

( डॉ.अभय वाघ )
संचालक
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत- मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / एचएमसीटी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थाना त्यांचे स्तरावरुन कळविण्यात याव्यात.

२. प्राचार्य, सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी पदविका तंत्रनिकेतने

३. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई

४. कार्यासन क्रमांक १० निवड नस्तीस.

E/Year2018/Admission 2018-19/Dip unaided Transfer

## ANNEXURE - A

## APPLICATION FOR CHANGE OF COURSE OR INSTITUTION AFTER I & II YEAR

1. Name of the Student (In Full) :
2. Application ID :
3. Academic year of Admission in the present Institute :
4. Whether Admission is under Supernumerary quota (Y/N) :
5. Address for correspondence with Pin code & Telephone Nos. ( if any) :
6. Name of parent / present Institute with DTE Code :
7. Course of Study Details :
8. Details of the Result of last exam.

| Branch Faculty | Year / Semester | Year of Passing | Summer / Winter | No. of attempt | Percentage |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
| | | | | | |

9. Details of backlog subject (if any) :
10. Name and DTE code of aspiring institute where admission by transfer is sought :
11. Branch & Year / Semester and university in which admission by transfer is sought :
12. Reasons for change of Institute/ change of branch and University :

I the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is up to the authority to decide my case on the basis of merit.

Signature of Student

Date : / /2018

Name and DTE code of the parent / present Institute: ____________________

Date :- / /2018

No --------------------

### No Objection Certificate

Certified that information furnished by applicant (Name) ---------------------------- is verified form the record. His / Her admission was not under supernumerary quota / TFWS category.. This institute has no objection for his / her transfer from this college / institute.

Seal of College / Institute                Signature of Principal

Name and DTE code of the Aspiring Institute: ____________________

Date :- / /2018

No --------------------

### No Objection Certificate

This institute has no objection & agrees to admit the above candidate Shri / Kum. ________________ to the branch ____________ to Year / Semester ____________ during the current academic year __________ . After admitting all the internal students and ex-students and exhausting the claims of change of branch of internal candidates, the vacancies in year and course ________ are ________ ( Nos.) I have ascertained the eligibility of the candidate for the above mentioned admission.

Seal of College / Institute                Signature of the Principal

**Note: Institute's NOC can be issued on the letter head of the College / Institute separately if desired so by Director / Principal.**

## Statement B

### Statement showing the list of candidate applied for change of Institute & Branch for Second /Third year for A.Y. 2018-19

| Sr. No | Name of the Students | Application ID | Name of Current Institute | Year and Course Name (e.g. 2nd / 3rd year — Engg./tech.) | Choice Code No. | Whether Admission is under Supernumer ary quota (Y/N) | Total Marks obtained (Out of Grand total) | % of Marks | Preferencewise Institute Name | Institute Code No. | Year and Course Name (e.g. 2nd / 3rd year — Engg./tech.) | Choice Code No. | Reasons for Transfer | Remarks (Institute) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

Seal of College / Institute

Signature of Principal

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


अतितात्काळ
कालमर्यादीत दि. ५.७.२०१८ पर्यंत

जा. क्र. १०/एनजीपी/संस्था स्थलांतरण /२०१८/ ५११
दिनांक : 21 JUN 2018

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व
विद्यापीठ व्यवस्थापित संस्था.
(अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था)
( स्वायत्त संस्था वगळून )

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये शासकीय व शासन अनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ. पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

पहा : १) शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१८/सी.आर.२६/टीई-४, दि. ०५.०६.२०१८
२) शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.४७३(भाग-३)/तांशि ४, दि. २४.०४.२०१७
३) शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.४७३/१६)तांशि ४, दि. २५.०४.२०१७
४) शासन अधिसूचना क्रमांक टीईएम - २०१५/सीआर २३६/टीई-४, दि. ११.०३.२०१६
५) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५

सहसंचालक, तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, मुंबई
आवक क्रमांक : 4897
दिनांक : 22 JUN 2018

महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ ची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने संचालनालयाच्या अधिपत्याखालील पुर्णवेळ व्यावसायिक पदविका पाठ्यक्रमांच्या प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षाचे ( अभियात्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरींग टेक्नॉलॉजी ) नियम संदर्भ क्रमांक २ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. तद्नंतर दि. ०५/०६/२०१८ च्या अधिसूचनेद्वारे रिक्त जागांच्या गणनासंबंधीच्या तरतूदीमध्ये सुधारणा केलेली आहे, परंतू "विद्यार्थी स्थानांतरण" संदर्भातील दि. २४.०४.२०१७ च्या अधिसूचनेतील नियम क्र. १६ मध्ये कोणताही बदल केलेला नाही. दि. २४.०४.२०१७ च्या अधिसूचनेतील नियम तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित व विद्यापीठ संचालित व्यावसायिक शैक्षणिक संस्थामधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये लागू केले आहे. सबब सदर नियमाच्या आधारे शै.व. २०१८-१९ साठीच्या प्रवेशाच्या माहिती पुस्तीकेतील ( Informaton Brochure ) नियम क्रमांक १६ मध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. त्यानुसार शासकीय व शासन अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र या पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याच्या संस्था बदल, शाखा बदल इ. बाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

१. प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर ,पाठयक्रम किंवा पाळी बदलण्याची विनंती करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांना जागांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून त्याच संस्थेत तसे बदल करण्याची तरतूद असून सदर बदल प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे करावयाचे आहेत. तरी, आपल्या संस्थेतील ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदलाकरीता अर्ज /विंनती केली आहे अशा विद्यार्थ्यांना जागांच्या उपलब्धतेनुसार प्रथम वर्षातील गुणवत्तेच्या आधारे प्राधान्य निश्चित करून आपले स्तरावरुन (संस्था स्तरावरुन) नियमाचे काटेकोरपणे पालन करुन मान्येतेची कार्यवाही करावी.

२. एका शासकीय, शासन अनुदानित व विद्यापीठ संचलित तंत्रनिकेतनातून दुस-या शासकीय, शासन अनुदानित व विद्यापीठ संचलित तंत्रनिकेतनामध्ये पहिल्या व द्वितीय वर्षानंतर संस्था बदलाची तरतूद करण्यात आलेली आहे. म्हणून आपल्या महाविद्यालयातील जे विद्यार्थी इतर शासकीय व शासन अनुदानित संस्थेत (स्वायत्त संस्था वगळून) बदलीसाठी इच्छुक आहेत, अशा विद्यार्थ्यांना संदर्भ क्रमांक २ मधील बदलीबाबतचे नियम निदर्शनास आणून दयावेत. आपल्या संस्थेतील जे विदयार्थी इतर शासकीय व शासकीय अनुदानित संस्थेत बदलीसाठी आपणाकडे अर्ज करतील

अशा सर्व विद्यार्थ्यांची बदली बाबत त्यांनी दिलेली कारणे (वैद्यकीय, आर्थिक अडचण, वडिलांची/पालकांची बदली इत्यादी) नमूद करुन विदयार्थ्यांची नांवे गुणानुक्रमाने एकत्रितरित्या सोबत जोडलेल्या "Annexure B" मध्ये Microsoft Excel sheet मध्ये भरुन समर्पक कारणे व विद्यार्थ्याचे दोन्ही अभ्यासक्रमाचे Choice Code No. भरुन आपल्या शिफारशी दिनांक ५ जुलै, २०१८ पूर्वी या संचालनालयास सादर करण्यांत याव्यात. तसेच desk10@dtemaharashtra.gov.in या ई-मेल वर सदर माहितीची Soft copy सुध्दा उपलब्ध करून द्यावी.

३. अ.क्र. २ नुसार विद्यार्थ्यांचे संस्था बदलाचे प्रस्ताव सादर करतांना या पत्रासोबतच्या "Annexure A" च्या नमुन्यात विद्यार्थ्यांचा विनंती अर्ज, गुणपत्रिकांची साक्षांकीत प्रत,पाठयक्रम बदल असल्यास महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे पात्रता प्रमाणपत्र, शिक्षणात खंड असल्यास त्याबाबत प्राचार्यांचे प्रमाणपत्र किंवा रु. १००/- च्या स्टॅंप पेपरवर प्रतिज्ञापत्र, प्रथम वर्ष किंवा द्वितीय वर्ष प्रवेशाचे अॅलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास) व संस्था बदलीच्या कारणाच्या पुष्ठर्थ पुरावे, इ. दस्तावेज सादर करावीत

४. विद्यार्थ्यांना, कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त संस्थामध्ये संस्थाबदल अनुज्ञेय नाही अशी स्पष्ट तरतूद संदर्भ क्रमांक २ अन्वये निर्धारीत केलेल्या नियमात असल्याची बाब संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी व असे अर्ज आपल्या स्तरावरुन निकाली काढण्यात यावेत.

५. अधिसंख्य कोटयातील ( Supernumerary Quota seats )जागे अंतर्गत प्रवेश देण्यात आलेले विद्यार्थी हे पाठयक्रम किंवा संस्था बदलण्यासाठी पात्र असणार नाहीत.

६. बदली मागितलेल्या विद्यार्थ्यांस या संचालनालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट द्यावे व कोणत्याही परिस्थितीत तत्पुर्वी ते देण्यात येवू नये. तसेच संबंधित विद्यार्थ्याच्या संस्था बदलीसाठी केवळ ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या कारणास्तव त्यांचे संस्थेतील प्रवेश रद्द करु नये. तसेच संस्थेतील सर्व बदली इच्छुक विद्यार्थ्यांची गुणवतेच्याक्रमाने यादी तयार करतांना सदरहू विद्यार्थ्याच्या प्रवेशाचा प्रकार सुपरन्युमरी कोटयातील आहे किंवा कसे? याच्या तपशीलासह व आपल्या शिफारशीसह या कार्यालयास सादर करावी व या संदर्भात कोणत्याही विद्यार्थी व पालकांस या प्रकरणी संचालनालयास संपर्क साधण्यास सूचित करू नये.

येथे असेही नमूद करण्यात येते की, समर्पक कारणे व आपल्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय विद्यार्थ्यांच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यांत येणार नाही. तसेच द्वितीय वर्षाची अभ्यासक्रमनिहाय रिक्त जागांची माहिती सोबतच्या "Annexure C" मध्ये सादर करावी. विद्यार्थी ज्या संस्थेत व अभ्यासक्रमात शिकत आहे व ज्या संस्थेत बदली मागितलेली आहे. त्या संस्थेच्या नांवासमोर इन्स्टीटयुट कोड, अभ्यासक्रमाचे नांव व कोर्स कोड नमूद करण्यांत यावा.तसेच याबाबतची माहिती आपल्या शिफारशीसह निश्चितपणे दि. ०५.०७.२०१८ पर्यंत या संचालनालयास प्राप्त होईल अशा बेताने पाठवावी, तद्नंतर आलेली प्रकरणे व माहितीचा विचार करण्यात येणार नाही अशी प्रकरणे दप्तरी दाखल केली जातील याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-

१. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित

ANNEXURE - A

## APPLICATION FOR CHANGE OF COURSE OR INSTITUTION AFTER I & II YEAR

१. Name of the Student (In Full) :

२. Application ID :

३. Academic year of Admission in the present Institute :

४. Whether Admission is under Supernumerary quota (Y/N) :

५. Address for correspondence with Pin code & Telephone Nos. ( if any) :

६. Name of parent / present Institute with DTE Code :

७. Course of Study Details :

८.. Details of the Result of last exam.

| Branch Faculty | Year / Semester | Year of Passing | Summer / Winter | Full pass/pass with one ATKT | Percentage |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| | | | | | |

९. Details of backlog subject (if any) :

१०. Name and DTE code of aspiring institute where admission by transfer is sought :

| Preference wise Institute Name | Institute Code No. | Year and Course Name (e.g. २nd year ---- Engg./tech.) | Choice Code No. |
|---|---|---|---|
| | | | |

११. Reasons for asking the transfer of Institute/ change of branch : ____________________
____________________
____________________

I the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is up to the authority to decide my case on the basis of merit.

**Date : / /2018** **Signature of Student**

---

Name and DTE code of the parent / present Institute: ____________________

No -------------------- Date :- / /2018

### No Objection Certificate

Certified that information furnished by applicant (Name) ---------------------------- is verified form the record. His / Her admission was not under supernumerary quota / TFWS category.. This institute has no objection for his / her transfer from this college / institute.

Seal of College / Institute Signature of Principal

## Statement B

### Statement showing the list of candidate applied for change of Institute & Branch for Second /Third year for A.Y. 2018-19

| Sr. No | Name of the Students | Application ID | Name of Current Institute | Year and Course Name (e.g. 2nd / 3rd year — Engg./tech.) | Choice Code No. | Whether Admission is under Supernumer ary quota (Y/N) | Total Marks obtained (Out of Grand total) | % of Marks | Preferencewise Institute Name | Institute Code No. | Year and Course Name (e.g. 2nd / 3rd year — Engg./tech.) | Choice Code No. | Reasons for Transfer | Remarks (Institute) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| Seal of College / Institute | Signature of Principal |

Name of the Institute :

DTE Code :

## Statment C

### Statements Showing Vacancy Position for A.Y. 2018-19

| Sr. No. | Name of Branch | Year | Sanctioned Intake 2017-18 or respective year of 1st year Admisson | Students admitted A.Y. 2017-18 (as per Col. 4) | Vacancy [ Col. 4-5 ] | Admission cancelled during A.Y. 2017-18 | Sudents admitted due to Change of branch at Institute level | Sudents shifted due to Change of branch at Institute level | Net Vacancy available [Col. (6+9)- (7+8-)] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 9 |
| | | Second | | | | | | | |
| | | Third | | | | | --- | --- | |
| | | Final | | | | | --- | --- | |
| | | | | | | | | | |

Seal of College / Institute

Signature of Principal